www.rajdand.com
पुणे, शनिवार
18.02.2023
पृष्ठ : ४ । मूल्य : ₹ ४.०० । माघ कृ.१२
/rajdandlive
Declaration No. : SDM/SR/07/2023

मराठी माणसाचा मानदंड
राजदंड
स्थापना १९९९
मुख्य संपादक : राही भिडे




# 'शिवसेना' नाव आणि 'धनुष्य बाण' शिंदे गटाला

## उद्धव ठाकरे गटाला निवडणूक आयोगाचा दणका

**नवी दिल्ली : प्रतिनिधी**

**'शिवसेना' हे नाव आणि 'धनुष्य बाणा'चे चिन्ह निवडणूक आयोगाकडून शिंदे गटाला प्रदान करण्यात आले आहे. हा निर्णय घेऊन मुंबई महापालिकेच्या निवडणुकीपूर्वी निवडणूक आयोगाने उद्धव ठाकरे गटाला मोठा दणका दिला आहे. शिवसेना हा पक्ष लोकशाही पद्धतीने चालवला गेला नसल्याची टीकाही निवडणूक आयोगाने केली आहे.**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत बंड करून तब्बल ४० आमदार आणि तेरा खासदार स्वतः च्या झेंड्याखाली आणत पक्ष आणि पक्षाचे निवडणूक चिन्ह यावर दावा केला. खरी शिवसेना आपलीच, असा दावा करून उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे या दोन्ही गटांनी निवडणूक आयोगाकडे दाद मागितली.

या प्रकरणाचा निर्णय लागेपर्यंत निवडणूक आयोगाने धनुष्यबाणाचे चिन्ह गोठवून ठेवले. उद्धव ठाकरे गटाला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे असे नाव, तर शिंदे गटाला बाळासाहेबांची शिवसेना असे नाव देण्यात आले. याप्रकरणी अंतिम निर्णयाची प्रतीक्षा शिवसेनेच्या दोन्ही गटातच नव्हे तर राज्यभरातील राजकीय वर्तुळाला होती.

अखेर मुंबई महापालिका निवडणुका तोंडावर असताना निवडणूक आयोगाने याप्रकरणी निर्णय दिला आहे. शिवसेनेची घटना लोकशाही विरोधी आहे. कोणत्याही पक्षांतर्गत निवडणुका न घेता पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याची लोकशाही विरोधी पद्धत या पक्षाने अवलंबली आहे, अशी टिपणी निवडणूक आयोगाने केली आहे.

# स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षात लोकशाही संकटात

## उद्धव ठाकरे यांचा केंद्र सरकारवर निशाणा

**मुंबई : प्रतिनिधी**

'शिवसेना' आणि 'धनुष्यबाण' शिंदे गटाला देण्याचा निवडणूक आयोगाचा निर्णय हा भारतीय लोकशाहीवरचा हल्लाच झाला आहे. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षात देशातील स्वातंत्र्य संपुष्टात येऊन बेबंदशाही सुरू झाली आहे, हे पंतप्रधानांनी लाल किल्ल्यावरून जाहीर करावे, अशा कठोर शब्दात माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी निवडणूक आयोग आणि सत्ताधारी भारतीय जनता पक्षावर टीका केली आहे.



निवडणूक आयोगाने शिवसेना हे नाव आणि धनुष्यबाण हे निवडणूक चिन्ह शिंदे गटाला देण्याचा निर्णय जाहीर केला आहे. या निर्णयावर उद्धव ठाकरे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

निवडणूक आयोगाचा हा निर्णय म्हणजे लोकशाहीचा अंत आहे. केवळ निवडून आलेले लोकप्रतिनिधी म्हणजे पक्ष असेल तर कोणताही उद्योगपती किंवा धनाढ्य माणूस पैशाच्या जोरावर पक्ष चालवू शकेल. कदाचित मुख्यमंत्री किंवा पंतप्रधानही होऊ शकेल, असेही ठाकरे म्हणाले. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय घेण्यापूर्वी निवडणूक आयोगाने आपला निर्णय जाहीर करणे अयोग्य असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले.

# निवडणूक आयोगाचा निर्णय हा 'खोक्यांचा विजय'

## ▪ उद्धव ठाकरे गटाचे प्रवक्ते संजय राऊत यांची प्रतिक्रिया

**मुंबई : प्रतिनिधी**

चाळीस चोरांनी ज्या खोक्यांचा वापर करून महाविकास आघाडी सरकार पाडले आणि सत्ता केली त्याच खोक्यांचा वापर करून शिवसेना पक्ष आणि निवडणूक चिन्ह विकत घेण्याचा डाव साधला आहे. मात्र, निवडणूक आयोगाच्या या निर्णयाला न्यायालयात आव्हान दिले जाईल, अशी प्रतिक्रिया उद्धव ठाकरे गटाचे प्रवक्ते खासदार संजय राऊत यांनी दिली.

देशातील सर्व स्वायत्त संस्था आपल्या अंकित करण्याचा सत्ताधाऱ्यांचा डाव आहे. त्यात पहिला क्रमांक निवडणूक आयोगाचा लागला आहे. बाळासाहेब ठाकरे आणि लाखो शिवसैनिकांनी रक्त सांडून उभी केलेली शिवसेना शिंदे यांच्या घशात घालण्याचा निर्णय देणाऱ्या निवडणूक आयोगावरचा जनतेचा विश्वास संपुष्टात आला आहे, अशी टीकाही त्यांनी केली.

केवळ आमदार गेले म्हणून पक्ष जात नसतो, कार्यकर्ते आणि विचारांना मानणारा मतदार यांच्या जीवावर पक्ष उभा असतो, अशी भूमिका ठाकरे गटाकडून वारंवार मांडण्यात आली आहे. पदाधिकारी आणि कार्यकर्ते आपल्या बाजूने असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र दोन्ही गटांनी निवडणूक आयोगाला यापूर्वीच सादर केले आहे.



मात्र, लोकशाही तत्वांचे पालन न केल्याचा ठपका ठेवत निवडणूक आयोगाने शिवसेना हा पक्ष आणि धनुष्यबाणाचे चिन्ह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटाकडे सुपूर्त केले आहे.

# काँग्रेस-राष्ट्रवादीच्या ताब्यात गेलेला 'धनुष्यबाण' आम्ही सोडवला

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची ठाकरेंवर टीका

**मुंबई : प्रतिनिधी**

२०१९ ला काँग्रेस-राष्ट्रवादीच्या ताब्यात गेलेला धनुष्यबाण आम्ही सोडवला. निवडणूक आयोगाच्या निर्णय हा बाळासाहेबांचे विचार विकण्याचे पाप करणाऱ्याना मोठी चपराक आहे, असा घणाघात मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची उद्धव ठाकरेंवर केला.


केंद्रीय निवडणूक आयोगाने आज एकनाथ शिंदे यांना शिवसेना आणि पक्षचिन्ह दिले. त्यानंतर उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेत आपली भूमिका स्पष्ट करीत शिंदे गटावर आसूड ओढला. त्यानंतर एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंच्या वक्तव्यांवर प्रत्युत्तर दिले. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरेंच्या स्मृतीस्थळी दर्शनासाठी आल्यानंतर एकनाथ शिंदे हे माध्यमांशी बोलत होते.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्णयाचे मी स्वागत करतो. सत्याचा विजय झाला. बाळासाहेबांच्या विचारांचा विजय झाला. आनंद दिघेंच्या विचारांचा विजय आहे. लोहशाहीचा विजय आहे.

सीएम शिंदे म्हणाले, या देशात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या घटनेवर आपला कारभार चालतो. हा विजय बहुमताचा आणि लोकशाहीचा विजय आहे. पन्नास आमदारा, तेरा खासदार, जि. प. सदस्यांपासून लाखो कार्यकर्ते, शिवसैनिकांचे मी अभिनंदन करतो.

सीएम शिंदे म्हणाले, कुणी कितीही काही म्हटले तरी सत्य कुणालाही लपवता येणार नाही. टाळता येणार नाही. आम्ही बाळासाहेबांचे विचार पुढे निर्णय घेतला. त्यांच्या विचारांचा हा विजय आहे. खऱ्या अर्थाने त्यांनी बाळासाहेबांचे विचार कुणाच्या तरी दावणीला बांधले. विचार विकण्याचे पाप केले त्यांना ही मोठी चपराक आहे.

सीएम शिंदे म्हणाले, जेव्हा जेव्हा त्यांच्या बाजूने निकाल लागतात. तेव्हा न्यायव्यवस्था बरोबर असते आणि



त्यांच्याविरोधात निकाल लागले तर न्यायव्यवस्था, स्वायत्तसंस्था विकली गेली, विरोधात आहे असे ते म्हणतात. लोकशाहीचा खून, लोकशाही विकली गेली असे ते म्हणतात.

सीएम शिंदे म्हणाले, त्यांना त्यांची जागा आजच्या निकालाने दाखवून दिली. त्यांनी तर हे पूर्वीच मान्य केले होते की, धनुष्यबाण गोठवले जाईल. परंतु, त्यांनी २०१९ ला धनुष्यबाण राष्ट्रवादी आणि काँग्रेसकडे गहाण ठेवला होता त्यांच्याकडून मी सोडवला. केविलवाणा प्रयत्न आहे. सहानभुती मिळवण्याचा, आपले कार्यकर्ते दुसरीकडे जाऊ नये म्हणून त्यांचे प्रयत्न आहेत.

सीएम शिंदे म्हणाले, निवडणूक आयोग स्वायत्त आहे त्यावर आक्षेप, आरोप करू शकत नाही. करता कामा नये. खरे म्हणजे तुम्ही लोकशाहीला घातक आहात. आता तरी तुमच्यात सुधारणा घडू द्या. आम्ही पन्नास आमदार आणि तेरा खासदार, लाखो कार्यकर्ते चोर आणि तुम्ही बरोबर हे कसे, आम्ही सोडून गेलो तर गुन्हेगार कसे तुम्हीच आत्मचिंतन करा की, एवढे लोक का सोडून गेले.

सीएम शिंदे म्हणाले, निवडणूक आयोगाने ज्या पक्षाने केलेल्या नेमणुका किती व कशा केल्या हे मोजमाप ते करत नाही. पन्नास आमदार, अठरा खासदार आणि शेकडो नगरसेवक, पंचायत समिती, जि. प. सदस्य आमच्यासोबत मग मेरीट आमच्याकडेच आहे. हे व मतदान लक्षात घेवून निवडणूक आयोगाने निर्णय दिला. अल्पमताला लोकशाहीत महत्व नाही. आरोप करण्याचा त्यांचा अधिकार आहे. त्यांनी तो करावा आम्ही उत्तर देत बसत नाही.

# पहाटेच्या शपथविधीचा विषय इतक्या दिवसांनी का?

## शरद पवार यांचा देवेंद्र फडणवीस यांना सवाल

**पुणे : प्रतिनिधी**

पहाटेचा शपथविधी राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्या संमतीने झाला होता या उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दाव्यावर प्रतिक्रिया व्यक्त करण्यास पवार यांनी नकार दिला. मात्र, हा विषय इतक्या दिवसांनी आता का बाहेर काढण्यात आला, असा सवाल त्यांनी फडणवीस यांना केला आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणात गाजलेला पहाटेच्या शपथविधी हा अजित पवार यांचे बंड म्हणून ओळखला जात असला तरीही प्रत्यक्षात राष्ट्रवादी काँग्रेसने स्थिर सरकारसाठी भाजपबरोबर येण्याची तयारी दर्शवल्याने शरद पवार यांच्या संमतीनेच हा शपथविधी झाला, असा दावा फडणवीस



यांनी नुकताच केला आहे. यावर आणखीही काही बोलायचे आहे. मात्र, ते योग्य वेळ आल्यानंतरच, असे सांगत फडणवीस यांनी याबाबतची उत्सुकता ही ताणून धरली आहे.

फडणवीस यांच्या या विधानाबाबत विचारले असता पवार यांनी प्रतिक्रिया देण्यास नकार दिला. या विधानावर प्रतिक्रिया देऊन फडणवीस यांचे महत्त्व वाढवण्याची आपली इच्छा नाही, असे त्यांनी नमूद केले. मात्र, फडणवीस यांनी हा विषय आत्ताच इतक्या दिवसांनी का काढला, असा सवालही त्यांनी केला.

**बापट यांना यातना देणे अयोग्य**

भाजपा नेते खासदार गिरीश बापट यांची प्रकृती फारशी ठीक नाही. आपण त्यांना भेटून आलो आहोत. आजारी असतानाही त्यांनी भाजपच्या मेळाव्याला हजेरी लावली. प्रत्यक्षात त्यांची प्रकृती पाहता त्यांना अधिक यातना देणे योग्य नाही, असे मत पवार यांनी व्यक्त केले.

# भाजपकडून होत आहे बापट यांच्या जीवाशी खेळ

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या शहराध्यक्षांचा गंभीर आरोप

**पुणे : प्रतिनिधी**

कसबा विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या पायाखालची वाळू सरकू लागल्यामुळेच आजारी असलेल्या खासदार गिरीश बापट यांना प्रचाराच्या मैदानात उतरवून भाजप त्यांच्या जीवाशी खेळ करत आहे, असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी केला आहे.

कसबा पोट निवडणुकीच्या प्रचारासाठी कार्यकर्त्यांचा मेळावा नुकताच केसरी वाड्यात पार पडला. या मेळाव्यात आजारी असलेल्या खासदार गिरीश बापट यांनी नाकाला ऑक्सिजनची नळी आणि हाताला ऑक्सिमीटर लावून हजेरी लावली. महायुतीचे उमेदवार हेमंत रासने यांचे मतदारसंघातील काम चांगले



असून कार्यकर्त्यांनी अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचण्याची आवश्यकता आहे, असे आवाहन बापट यांनी या मेळाव्यात केले. मात्र त्यांच्या उपस्थितीमुळे विरोधकांनी भाजपला टीकेचे लक्ष्य केले आहे.

मागील पाच वर्ष भाजपाने बापट यांच्याकडे पूर्ण दुर्लक्ष केले. मात्र, कसब्याच्या निवडणुकीत भाजप अडचणीत आल्याने पक्षाने त्यांच्याकडे धाव घेतली. अनेक नेत्यांनी आजारी असलेल्या बापट यांची भेट घेऊन त्यांना प्रचाराच्या मैदानात उतरण्याची गळ घातली. त्यामुळे बापटही या मेळाव्याला उपस्थित राहिले. मात्र हा त्यांच्या जीवाशी खेळ आहे, अशी टीका जगताप यांनी केली.

# कराची पोलीस मुख्यालयावर जोरदार गोळीबार, किमान सात हल्लेखोरांकडून गोळीबार

## मुख्यालय आंतकवाद्यांच्या ताब्यात; धुमश्चक्री सुरूच

**कराची : वृत्तसंस्था**

पाकिस्तानातील कराची येथील पोलीस मुख्यालयावर झालेल्या हल्ल्यात अजूनही गोळीबार सुरू आहे. पाकिस्तानचे गृहमंत्री राणा सनाउल्लाह यांना आयजी सिंध यांनी सांगितले की, सहा ते सात हल्लेखोर पोलिस मुख्यालयात घुसले आहेत. हल्लेखोर आंतकवाद्यांनी सिंध पोलिसांचे मुख्यालय ताब्यात घेतले आहे.

एका स्थानिक टीव्ही चॅनलशी बोलताना ते म्हणाले की, केंद्र सरकार सिंध सरकारच्या संपर्कात आहे आणि सर्व प्रकारची मदत देण्यास तयार आहे. राणा सनाउल्ला म्हणाले की, सध्या इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर हल्लेखोरांवर कारवाई सुरू आहे.

मंत्र्यांनी सांगितले की, हल्लेखोरांनी वाहन उभी केल्यानंतर हातबॉम्बही फेकले. तहरीक-ए-तालिबान पाकिस्तानने (टीटीपी) हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे.

कराचीमध्ये यावेळीही पोलिस आणि हल्लेखोरांमध्ये जोरदार गोळीबार सुरू आहे. हल्लेखोरांनी हँडग्रेनेडचाही वापर केला आहे. मुख्यालयातील कर्मचाऱ्यांनी इमारतीची वीज बंद केली आहे आणि इमारतीचे सर्व प्रवेशद्वार बंद केले आहेत. शहरातील इतर भागातील पोलिसांना मुख्यालयाकडे पाठवले जात आहे.

सिंध सरकारचे प्रवक्ते मुर्तझा वहाब यांनी रॉयटर्सला सांगितले की, सध्या त्यांच्याकडे या घटनेबद्दल अधिक माहिती नाही.

एफपी या वृत्तसंस्थेनुसार, पाकिस्तानी वृत्तवाहिनी जिओ टीव्हीशी बोलताना सिंध प्रांताचे माहिती मंत्री शरजील इमाम मेनन म्हणाले की, ''आमच्याकडे अद्याप हल्लेखोरांच्या संख्येची माहिती नाही.''

पेशावरच्या मशिदीवरील हल्ल्यात १०० जणांचा मृत्यू झाला होता.

पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री बिलावल भुट्टो झरदारी यांनी या हल्ल्यावर ट्विट




केले आहे. त्यांनी लिहिले, ''कराची पोलिसांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा निषेध करा. यापूर्वीही सिंध पोलिसांनी दहशतवादाचा धैर्याने सामना केला आहे आणि त्याला पराभूत केले आहे. आम्हाला त्यांच्यावर पुन्हा असाच विश्वास आहे. असे भ्याड हल्ले आम्हाला परावृत्त करणार नाहीत.''

सिंधमध्ये बिलावल यांच्या पक्षाचे पाकिस्तान पीपल्स पार्टीचे सरकार आहे.

# गुलाबराव पाटील जन्मशताब्दी सांगता सोहळ्याला शरद पवार, एच. के. पाटील उपस्थित राहणार; सोमवारी कार्यक्रम

## आ. मानसिंगराव नाईक, पृथ्वीराज पाटील यांची माहिती

**सांगली : प्रतिनिधी**

सहकारतीर्थ गुलाबराव पाटील यांचा जन्मशताब्दी वर्ष सांगता सोहळा सोमवार, दि. २० फेब्रुवारी रोजी सकाळी दहा वाजता येथील तरुण भारत स्टेडियमवर होणार आहे. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ नेते खासदार श्री. शरद पवार आणि काँग्रेसचे महाराष्ट्राचे प्रभारी श्री. एच. के. पाटील हे उपस्थित राहणार असल्याची माहिती सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष, आमदार श्री. मानसिंगराव नाईक आणि गुलाबराव पाटील शिक्षण संकुलाचे संस्थापक, सांगली शहर जिल्हा काँग्रेसचे काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री. पृथ्वीराज पाटील यांनी आज येथे दिली.

सहकारतीर्थ गुलाबराव पाटील जन्मशताब्दी समिती आणि सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड, सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने हा सोहळा होणार असल्याचे त्यांनी सांगितले. गुलाबराव पाटील हे जिल्हा बँकेचे शिल्पकार आहेत. तीस वर्षे त्यांनी या बँकेसाठी अध्यक्ष व संचालक म्हणून काम केले आहे. शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी त्यांनी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. सहकारी साखर कारखाने, सूतगिरण्या तसेच अन्य संस्थांसाठी त्यांनी खूप काही काम केले आहे. त्यांचे हे योगदान लक्षात घेऊन त्यांना जन्मशताब्दी वर्षात आदरांजली वाहण्यासाठी हा कार्यक्रम घेण्याचा निर्णय संचालक मंडळाने एकमताने घेतला. बँकेच्या आवारात गुलाबराव पाटील यांचा यापूर्वीच पुतळा उभा करण्यात आला आहे.

या कार्यक्रमास महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापती ना. नीलमताई गोऱ्हे, सांगलीचे पालकमंत्री ना. सुरेशभाऊ खाडे, राज्य उत्पादन शुल्क मंत्री ना. शंभूराजे देसाई, खासदार श्रीनिवास पाटील, खासदार रजनीताई पाटील, खासदार संजयकाका पाटील, माजीमंत्री आमदार हसन मुश्रीफ, माजी मंत्री आमदार बाळासाहेब पाटील, याशिवाय मोहनराव कदम, अनिलराव बाबर, पी. एन. पाटील, सुमनताई पाटील, विक्रम सावंत, अरुण लाड, जयंत आसगावकर हे आमदार तसेच सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिकेचे महापौर दिग्विजय सूर्यवंशी उपस्थित राहणार आहेत.



ते म्हणाले, गुलाबराव पाटील यांनी सहकार, समाजकारण आणि राजकारण या क्षेत्रामध्ये अत्यंत पारदर्शक आणि अभ्यासूपणाने काम केले आहे. शेतकरी आणि सर्वसामान्य माणूस आर्थिकदृष्ट्या सक्षम झाला पाहिजे आणि त्यासाठी सहकार चळवळीची मदत झाली पाहिजे, हा विचार त्यांनी मांडला. सहकार क्षेत्रामध्ये पारदर्शक आणि प्रामाणिक काम केले तर खूप चांगला विकास साधता येतो, हे त्यांनी दाखवून दिले. राजकारणसुद्धा त्यांनी अत्यंत स्वाभिमानाने केले. आमदार, खासदार, काँग्रेसचे महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष, सहकार क्षेत्रातल्या सांगलीपासून दिल्लीपर्यंतच्या विविध संस्थांवर अध्यक्ष म्हणून तसेच अन्य अभ्यास समित्यांवर त्यांनी खूप मोठे काम करून दाखवले. त्यांचे कार्य आजही सहकारी चळवळीला प्रेरणादायी राहिले आहे. हा कार्यक्रम त्यादृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

ते म्हणाले, या सोहळ्याच्यानिमित्ताने सहकारतीय गुलाबराव पाटील यांच्या जीवनावरील सहकारतीर्थ या जीवन चरित्राचे प्रकाशन तसेच सहकारतीर्थ गुलाबराव पाटील चौक नामकरण व सुशोभीकरणाचे लोकार्पण प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते होणार आहे.

ते म्हणाले, यावेळी माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांना त्यांच्या सामाजिक योगदानाबद्दल आणि बँकिंग तज विद्याधर अनासकर यांना बँकिंग क्षेत्रातील कामगिरीबद्दल सहकारतीय गुलाबराव पाटील पुरस्कार तसेच सहकारतीर्थ गुलाबराव पाटील ऋणानुबंध पुरस्कार माजी आमदार प्रा. शरद पाटील आणि सांगली जिल्हा कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष रामभाऊ घोडके यांना प्रदान करण्यात येणार आहे...

ते म्हणाले, माजी मुख्यमंत्री आमदार पृथ्वीराज चव्हाण, आमदार बाळासाहेब थोरात, आमदार जयंत पाटील, आमदार विश्वजीत कदम आमदार सतेज उर्फ बंटी पाटील, जिल्हा बँकेच्या उपाध्यक्ष जयश्रीताई पाटील, प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष विशाल पाटील, अजितराव पाटील बेनाडीकर हे या कार्यक्रमाचे निमंत्रक आहेत.

ते म्हणाले, गुलाबराव पाटील यांच्या जन्मशताब्दीनिमित्त गेल्या वर्षभरात विविध उपक्रम राबवण्यात आले. जन्मशताब्दी वर्षाचा शुभारंभाचा कार्यक्रम तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबईत विधान भवनाच्या मुख्य सभागृहामध्ये झाला होता.

# खंडकरी शेतकऱ्यांचा प्रश्न तात्काळ मार्गी लावा अन्यथा महसूल अधिकाऱ्यांना रस्त्यावर फिरु देणार नाही - राहुल बिडवे

**अकलूज : प्रतिनिधी**

अकलूज येथील उपविभागीय अधिकारी कार्यालय येथे माळशिरस तालुक्यातील खंडकरी शेतकरी साखळी उपोषण पहिला दिवस या आंदोलनाला रयत क्रांती संघटनेने जाहीर पांठिबा देऊन खंडकरी शेतकऱ्यांचे प्रश्न तात्काळ सोडवावे अन्यथा महसूल अधिकार्यांना रस्त्यावर फिरु देणार नाही असा ईशारा रयत क्रांती संघटनेचे राहुल बिडवे यांनी दिला.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि सदाशिवनगर मळा खंडकऱ्यांच्यामागण्यासदाशिवनगर शिवपुरी मळा श्रीपूर मळा येथील मागणी नुसार शेतकऱ्यांना जमीन



मिळावी. ज्यांचा नमुना क्रमांक १ मंजुर झाला आहे त्या शेतकऱ्यांना त्यांच्या पसंतीची जमीन उपलब्ध करुन द्यावी. खंडकऱ्यांना ज्या जमिनी मिळालेल्या आहेत त्या वर्ग दोन च्या आहेत त्या जमिनी वर्ग एक करुन मिळाव्यात ज्यांना जमिनी मिळाल्या आहेत त्यांची मोजणी व गटाची फाळणी करून हद्दी खुना करून द्यावी.

गेल्या दहा वर्षापासून प्रलंबित असलेल्या खंडकरी यांच्या बाबतीत तातडीने कार्यवाही व्हावी. ६) ज्यांची जमीन एक एकर च्या पेक्षा कमी गेली आहे ती त्या खंडकऱ्यांना एकर द्यावी. खंडकरी जमिनी वाटप करताना त्यांना पाठ पाणी व रस्ता द्यावा. ज्या जमिनीतून चारी किंवा रस्ता गेला आहे ते क्षेत्र वगळून जमिनी वाटप करुन द्याव्यात. माळशिरस तालुक्यात खंडकरी शेतकऱ्यांना ज्यांच्या जमिनी वाटप करायचे राहिलेले आहेत त्यांच्यासाठी अनुभवी प्रांताधिकारी किंवा फक्त खंडकरी प्रश्नासाठी स्वतंत्र अधिकारी नेमावा.

०२/१०/१९७५ प्रमाणे युनिट धरून जमीन वाटप व हदद् खुना करून मिळावी. ११) औरंगाबाद खंडपीठाच्या निर्णयानुसार (स्टे) प्रलंबित खंडकरी शेतकऱ्यांना जमीन वाटप होईपर्यंत संयुक्त शेतीस भाडेतत्वावर जमिनी देऊ नयेत व त्यात कुठल्याही प्रकारचा हस्तक्षेप करू नये. १२) २०१२ पासून जमीन वाटपापासून वंचीत राहिलेल्या खंडकरी वारसांना म.रा.शे.म. यांनी संयुक्त शेतीसाठी भाडे तत्वावर दिलेल्या दराप्रमाणे जमीन मिळेपर्यंतची नुकसान भरपाई मिळावी असे निवेदनात म्हटले आहे यावेळी रेल्वे संघर्ष समितीचे नेते अॅड सोमनाथ वाघमोडे, खंडकरी शेतकरी नेते भानुदास सालगुडे पाटील, रणजित चव्हाण, सुधाकर पांढरे, विठ्ठल गाढवे,राहुल खटके, अजित शिंदे व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लोणंद बस स्थानकातून दोन मंगळसूत्रांची चोरी

**सातारा :** लोणंद बस स्थानकातून दोन मंगळसूत्रांची चोरी झाल्याच्या तक्रारी लोणंद पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आल्या आहेत.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दिनांक १७ नोव्हेंबर २०२२ रोजी लोणंद तालुका खंडाळा गावच्या हाती असलेल्या लोणंद बस स्थानकातून एसटीमध्ये चढत असताना वंदना नामदेव शिंदे रा. चव्हाणवाडी, ता. फलटण यांच्या गळ्यातील ५० हजार रुपये किंमतीचे व सासवड येथील रंजना नेमचंद भुजबळ रा. सासवड, ता. फलटण यांचे २० हजार रुपये किंमतीचे सोन्याचे मंगळसूत्र अज्ञात चोरट्याने चोरून नेले आहे.

## स्व. आर. आर. पाटील यांना अभिवादन




**तुळजापूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री स्व. आर. आर. आबा पाटील यांच्या स्मृती दिनानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कार्यालयामध्ये त्यांच्या फोटोस राष्ट्रवादी काँग्रेसचे विधानसभा अध्यक्ष गोकुळ तात्या शिंदे व राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष धैर्यशील पाटील यांनी पुष्पहार अर्पण करून कै. आर आर पाटील यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.

या वेळी विनम्र अभिवादन करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे युवक तालुका अध्यक्ष संदीप गंगणे , राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नागरिक सेलचे जिल्हाध्यक्ष धनंजय काका पाटील , ओबीसी सेलचे तालुका अध्यक्ष विकी घुगे, युवा नेते गणेश नन्नवरे,ज्येष्ठ नेते शहाजी नन्नवरे, कोंडीबा प्रताप, बाळासाहेब चिखलकर आदी विनम्र अभिवादन करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कार्यालय मध्ये उपस्थित होते.

# अवैधरित्या वाळू वाहतूक केल्याप्रकरणी एकावर गुन्हा

## सुमारे ६ लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत

**सातारा : प्रतिनिधी**

अवैधरित्या वाळू वाहतूक केल्याप्रकरणी एकावर म्हसवड पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. याप्रकरणी सुमारे ६ लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १२ फेब्रुवारी रोजी ५ वाजण्याच्या सुमारास पळशी, ता. माण गावच्या हद्दीत धामणी-पळशी रस्त्यावर सागर जिजाबा खाडे वय २०, रा. पळशी, ता. मान हा त्याच्या ताब्यातील महिंद्रा कंपनीच्या ट्रॅक्टर ट्रॉली मध्ये चोरटी वाळू घेऊन जाताना आढळून आला.

याप्रकरणी खाडे याच्यावर म्हसवड पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून सुमारे ६ लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

अधिक तपास पोलीस हवालदार डी. पी. खाडे करीत आहेत.

# बक्षी समिती वेतन अहवालाची होळी; झेडपी कर्मचाऱ्यांकडून निदर्शने

**सोलापूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील जिल्हा परिषदेच्या अनेक संवर्गीय कर्मचाऱ्यांच्या वेतनत्रुट अमान्य करुन बक्षी समितीने अन्याय केल्याची घोषणा देत महाराष्ट्र राज्य जिल्हापरिषद कर्मचारी महासंघाच्या वतीने निर्देशने करत समिती आहवालाची होळी करण्यात आली. बक्षी समितीचा निषेध करण्यासाठी शुक्रवारी लिपीक कर्मचारी संघटना , कास्ट्राईब कर्मचारी संघटना , दिव्यांगा कर्मचारी संघटनेनी एकत्र येत जोरदार घोषणाबाजी केली.

महासंघाने दिलेल्या माहीती नुसार, नुकतेच शासनाने बक्षी समितीचा खंड २ चा अहवाल प्रसिध्द केला आहे. त्यामध्ये जिल्हा परिषदेच्या अनेक संवर्गाच्या मुख्यत्वे लेखा लिपीक यांच्या कर्मचाऱ्यांच्या वेतन त्रुटी दूर केली नसल्यामूळे जि. प.



कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. जि. प .च्या अनेक कर्मचारी संघटनांनी बक्षी समिती आयोगासमोर त्यांच्या वेतन त्रुटीबाबत साक्ष देऊन व आवश्यक ती कागदपत्रे दाखल करुनसुध्दा बक्षी समितीने त्याचा विचार केला नाही. त्यामुळे सोलापूर जिल्हा परिषदेतील मुख्यालय व तालुकास्तरीय वर्ग-३ व वर्ग-४ कर्मचारी आणि पंचायत समितीच्या आवारात बक्षी समिती आयोगाचा निषेध करण्यात आल्याचे सांगितले.

यावेळी कर्मचारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष राजेश देशपांडे, राज्य सरचिटणीस दिनेश बनसोडे, लिपीक कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष अविनाश गोडसे, सरचिटणीस नागेश पाटील, अनिल जगताप, सचिन जाधव, दिव्यांग संघटनेचे लक्ष्मण वंजारी यांच्यासह बहुसंख्येने कर्मचारी उपस्थित होते.

# शिवजन्मोत्सवाच्या निमित्ताने शांतता समितीची बैठक संपन्न

## आठवडी बाजार रविवार ऐवजी सोमवारी भरविण्यात येणार

**उस्मानाबाद : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्मोत्सव सर्वांनी शांतता आणि उत्साहात साजरा करावा, यावेळी ध्वनि आणि वायु प्रदूषण होणार नाही याची काळजी घ्यावी,असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओम्बासे यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित जिल्हा शांतता समितीच्या बैठकीत केले.

यावेळीजिल्हापोलीसअधीक्षक अतुल कुलकर्णी, सहायक पोलिस अधीक्षक एम. रमेश निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी,उपजिल्हाधिकारी(सामान्य प्रशासन)अविनाश कोरडे, उस्मानाबाद-तुळजापूरचे उपविभागीय अधिकारी योगेश खरमाटे, उपविभागीय परिवहन अधिकारी गजानन नेरपगार, राज्य उत्पादन शुल्कचे अधीक्षक गणेश बारगजे,उस्मानाबाद नगर परिषदेच्या मुख्य अधिकारी वसुधा फड उस्मानाबाद शहर पोलीस निरीक्षक उस्मान शेख स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक यशवंत जाधव तसेच मध्यवर्ती सार्वजनिक शिव जयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष धनंजय राऊत




आणि शिवराज्य अभिषेक सोहळा समितीचे अध्यक्ष धर्मराज सूर्यवंशी, शांतता समितीचे सदस्य प्रकाश जगताप, विश्वास शिंदे,मसूद शेख,अॅड.परवेज आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी म्हणाले की, डी जे ऐवजी पारंपरिक वाद्यांचा वापर करावा, तसेच मोटर सायकल रॅली व ऑटो रिक्षा रॅली काढतांना ध्वनि आणि वायु प्रदूषण होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. संभाव्य गर्दी लक्षात घेता यावेळी आठवडी बाजार रविवार ऐवजी सोमवारी भरविण्यात यावा, शहरातील रस्ते दुरुस्त करावे अशा सूचनाही जिल्हाधिका-यांनी मुख्याधिकारी श्रीमती फड यांना केल्या,.

जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. कुलकर्णी म्हणाले,मोक्यांच्या ठिकाणी चोख पोलीस बंदोबस्ताचे नियोजन करण्यात येणार असून कोणतीही अप्रिय घटना होवू नये याची काळजी पोलीस विभाग घेणारच आहे,तरी मिरवणूक व सोहळा आयोजकांनीही याबाबत दक्षता घ्यावी असे आवाहन केले.



**अकलूज :** संपूर्ण महाराष्ट्रात मोठ्या उत्साहात उद्या शिवजयंती साजरी होत आहे. अकलूज येथेही शिवजंयतीची जोरात तयारी सुरु असल्याचे पाहावयास मिळत आहे.

## आंबेघर येथे किराणा दुकानाचे आगीत लाखोंचे नुकसान

**केळघर : प्रतिनिधी**

आंबेघर तर्फ मेढा, ता. जावली येथे रात्री १० वाजता किराणा अँड जनरल स्टोअर दुकानाला अचानक आग लागली होती. या आगीत अंदाजे १२ ते १५ लाख रुपये किमंतीचे साहित्य भस्मसात झाले आहे असा अंदाज दुकानाचे मालक सुभाष शेलार यांनी व्यक्त केला आहे.

आंबेघर येथे सुभाष किराणा अँड जनरल स्टोअर मध्ये रात्री १० च्या सुमारास अचानक धूर आणि आगीचे लोट येऊ लागले. थोड्या वेळातच आगीने रौदरूप धारण केले. या लागलेल्या आगीमध्ये किराणा माल, फर्निचर, इलेक्ट्रिक समानाबरोबर इमारतीचे नुकसानीसह अनेक कंपन्यांच्या मालाचा साठा जळून खाक झाला.

आग विझवण्यासाठी सातारा येथील नगर पालकेतील अग्निशमन साठी फोन केला होता, पण अग्निशमन गाडीची वाट न पाहता गावातील लोकांनी आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न सुरू केले. काही वेळातच येथील तरुणांनी आग आटोक्यात आणण्यासाठी दुकानाच्या आत जावून आग विझवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत हळू हळू आग आटोक्यात आणली आणि आग विझवण्यात यश मिळविले. लागलेली आग शॉर्टसर्किटमुळे लागली असावी, असा अंदाज तेथील नागरिकांनी तसेच आग विझविणाऱ्या युवकांनी व्यक्त केला.

# खोट्या जातीच्या दाखल्याविरोधात अकलूजमध्ये जनआक्रोश

**अकलूज : प्रतिनिधी**

अनुसूचीत जाती- जमाती बचाव समीती, माळशिरस तालुका व विविध सामाजिक संघटनांच्या वतीने अकलूज येथील प्रांत कार्यालयावर जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला यामध्ये बहुसंख्येने बहुजन समाज बांधव सहभागी झाले होते.

या आंदोलनाची सुरुवात विश्वरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या बस स्थानकाजवळील पुतळ्याला अभिवादन करून झाली. यावेळी प्रांत कार्यालय येथे मोर्चा गेल्यानंतर त्या ठिकाणी अनेक जणांनी या विषयावर आपल्या भावना व्यक्त केल्या यावेळी प्रांताधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की,वेळापूर ता माळशिरस येथील जीवन उत्तमराव जानकर व ज्योती उत्तमराव जानकर यांनी सोलापूर येथील जात पडताळणी समिती यांच्या कोर्टात त्यांची मूळ जात हिंदू धनगर असताना बेकायदेशीर बनावट



कागदपत्रे काढून जिल्हा जात पडताळणी समितीकडे राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रातील लाभ उठवण्यासाठी अनुसूचित जातीच्या प्रमाणपत्राची मागणी केली आहे. सदर प्रकरण सोलापूर येथील जात पडताळणी समिती कोर्टात प्रलंबित आहे. सदरचा प्रकार हा अनुसूचित जातीवर अन्यायकारक आहे. उत्तम जानकर हे माळशिरस तालुक्यातील धनगर या जातीच्या प्रवर्गातील आहेत परंतु त्यांनी सुद्धा माळशिरस तालुक्यातील अधिकारी वर्गाच्या डोळ्यात धुळफेक करून हिंदू खाटीक असा दाखला काढून माळशिरस तालुक्याची आमदारकी लढवली आहे. तो खटला सध्या न्यायालयीन प्रलंबित असताना त्यांचे पुत्र जीवन व ज्योती जानकर यांनीही राजकीय, शैक्षणिक लाभ मिळवण्यासाठी खोटी कागदपत्रे सादर करून हिंदू खाटीक या जात पडताळणी प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे. सदरची मागणी पूर्णपणे चुकीची असून आधीच अनुसूचित जाती जमातींच्या लोकांमध्ये प्रचंड बेरोजगारी गरीबी असताना सध्या ते जगण्यासाठी सक्षम नाहीत. त्यांच्या हक्काच्या असणाऱ्या जागेवर जानकर कुटुंबातील लोकांकडून अतिक्रमण करण्याचे काम सध्या माळशिरस तालुक्यात चालू आहे.

अनुसूचित जातीत येऊन राजकीय व इतर सर्व फायदे उठवण्याचे कटकारस्थान चालू आहे. माळशिरस तालुक्यातीलच नव्हे तर तमाम महाराष्ट्रातील मागासवर्गीय लोकांच्या मध्ये यामुळे अस्वस्थता निर्माण झाली आहे. सदर घटना अनुसूचित जातीच्या जमातींच्या लोकांना धोकादायक स्थितीत घेऊन जाणारी आहे .तसेच संविधानाच्या विरोधात असून भविष्यात धनगर समाज व दलित समाजात तेढ निर्माण करणारी आहे तरी या प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी व बनावट कागदपत्राच्या आधारे त्यांना हिंदू खाटीक प्रमाणपत्र देण्यात येऊ नये अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच माळशिरस तालुक्यातील अनुसूचित जाती जमाती च्या सर्व जातींना शासकीय समितीत सदस्य करुन घ्यावे. माळशिरस तालुक्यातील बेघरांना घरकुलसाठी जागा उपलब्ध करून द्यावी. जीवन जानकर व ज्योती जानकर यांना बनावट कागदपत्रांच्या आधारे जात प्रमाण पत्र देणारे तत्कालीन तहसीलदार यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी.जानकर कुटुंबातील सदस्य लोकांनी बनावट जात दाखल्या आधारे कोणकोणत्या शासकीय योजनेचा लाभ घेतला आहे याची चौकशी करावी अन्यथा जिल्हाधिकारी सोलापूर यांच्या कार्यालयावर मोर्चा काढणार असल्याचेही सदर निवेदनात म्हटले आहे. यावेळी खोट्या जातीच्या दाखल्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली. सदर मोर्चा मध्ये बहुसंख्येने बहुजन बांधव सहभागी झालेले दिसले.

मुख्य *संपादक : राही भिडे, हे दैनिक राजदंड मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा. लि., सर्व्हे नं. १२९, हिस्सा नं. ११ / २ आणि १ / १३, वारजे पुणे - ४११ ०५८ येथे मुद्रित करून न्याती ग्रँडीयर, १०२ ग्रीनविच, कडनगर, उंड्री, पुणे -४११ ०६० येथून प्रकाशित केले. दैनिक राजदंडमधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. (*पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी) दूरध्वनी : पुणे (०२०)२६९०९०३१, इमेल-rajdand.pune@gmail.com
या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या लेख, बातम्या, जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील. Declaration No. : SDM/SR/07/2023

# सिद्धनाथ मंदिराच्या भुयारातील स्वयंभू शिवलिंग महाशिवरात्रीला रात्रभर खुले राहणार

**म्हसवड : प्रतिनिधी**

म्हसवड शहराचे ग्रामदैवत असलेल्या सिद्धनाथ मंदिरातील भूयारात असलेले स्वयंभू शिवलिंग दर वर्षी महाशिवरात्री निमित्त भाविकांना दर्शनासाठी खुले करण्यात येते, यंदाही ते शनिवार दि.१८ रोजी महाशिवरात्री निमित्त दर्शनासाठी खुले केले जाणार आहे अशी माहिती सिध्दनाथ देवस्थान ट्रस्टचे चेअरमन महेश गुरव, व्हा.चेअरमन वैभव गुरव ,सचिव दिलीप कीर्तने (गुरव) यांनी दिली आहे.

**स्वयंभु शिवलिंगाची महती अशी :**

महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र आदी भागातील लाखो भाविकांचे कुलदैवत व म्हसवडचे ग्रामदैवत असलेल्या श्री. सिद्धनाथ मंदिरातील भूयारात स्वयंभू शिवलिंग आहे. श्रीधरस्वामींच्या काशिखंड ग्रंथामध्ये कालभैरवाच्या उत्पत्ती विषयी देण्यात आलेल्या माहीतीनुसार शिव आणि विष्णू यांच्यात श्रेष्ठ कोण असा वाद निर्माण झाला. त्यावेळी गायत्री म्हणाली, शिवस्वरुप ब्रह्म अग्रगण्य आहे. सर्वकाही शिवाच्या अधिन असते, त्यामुळे सर्वश्रेष्ठ शिवच आहे. हे ऐकून ब्रह्मा आणि विष्णू यांना राग आला आणि त्यांनी गायत्री आणि शिवाचा निषेध केला. हे ऐकून शिवाचा क्रोध अनावर झाला. त्यांनी आपला उजवा हात क्रोधाने झटकला असता भूजदंडातून महांकाळ म्हणजेच काळभैरवाची उत्पत्ती झाली, त्याचवेळी शिवाच्या श्रेष्ठत्वाची प्रचिती सर्वांना आली व शिवशंकर लिंगरुपाने म्हसवड येथील भूयारात स्थित झाले. त्यामुळे म्हसवडचे श्री सिद्धनाथांचे स्थान मुळ काशी विश्वेश्वर काळभैरव शंकराचे मानले जाते. विश्वेश्वराचे रंक्षणकर्ते म्हणून काशितही काळभैरवांचा मान प्रथम आहे. शिवाचे रक्षणकर्ते व शिवअवतार म्हणून



काळभैरव म्हणजेच श्री. सिद्धनाथ व पत्नि जोगेश्वरी येथिल मंदिराच्या गाभा-यात भूयारात असणा-या सिंहासनावर आरुढ झाले अशी आख्यायिका आहे.

भूयार हे फक्त महाशिवरात्रीच्या रात्री भाविकांना खुले केले जाते वर्षभर हे भूयार बंद स्थितीत असते. मंदिराच्या गाभा-यात डाव्या बाजूला भूयाराचे प्रवेशद्वार आहे. या प्रवेशद्वारावर ठेवलेल्या छोटेखानी पलंगावर श्री. सिद्धनाथ व माता जोगेश्वरी यांच्या पंचधातूच्या उत्सव मूर्ती ठेवलेल्या असतात. भूयारातील शिवलिंगावर बांधण्यात आलेल्या सिंहासनावर श्री. सिद्धनाथांच्या मूर्तीबाबतही एक गोष्ट आश्चर्यकारक आहे. मंदिरातील सिंहासनावर असलेल्या श्रीसिद्धनाथ व माता जोगेश्वरी यांच्या मूर्तींना रोज सकाळी पंचामृत व गरम पाण्याने अभ्यंगस्नान घातले जाते, त्यावेळी भूयारातील स्वयंभू शिवलिंगावर थेबं थेंब पाणी पडत असते. वर्षभर बंद असलेल्या भूयारातील शिवलिंगाला रोज जलाभिषेक होतो हा पौराणीक वास्तूशिल्पाचा खास नमुना आहे.

महाशिवरात्रीला भूयारातील शिवलिंगास पारंपारिक पद्धतीने जलाभिषेक व पंचामृताचा अभिषेक करुन दहिभाताची पूजा बांधली जाते त्यानंतर हे शिवलिंग भाविकांना दर्शनासाठी खुले करण्यात येते, या भूयाराची उंची १२फूट असून भूयारात उतरण्यासाठी पाय-या आहेत एकाच व्यक्तिला जाता येइल इतकी अरुंद वाट असल्याने केवळ ८ ते १० भाविकानांच दर्शनासाठी सोडले जाते. त्यांना वर घे तल्यानंतर दुसऱ्यांना सोडले जाते या काळात भाविकांची गर्दी मोठ्या प्रमाणात होत असल्याने एका छोट्या यात्रेचेच स्वरुप शहराला प्राप्त होते. रात्री १० ते पहाटे ५ पर्यंत भाविक दर्शन घेत असतात यावेळी पोलिस बंदोबस्तही मोठ्या प्रमाणात ठेवण्यात येतो. मंदिरातील स्वयंभू शिवलिंगाच्या दर्शनानेच येथील महाशिवरात्रीची सांगता होते.

# आरोग्यसेवा क्षेत्रात निलेश बळी यांच्या कार्याचा अभिमान वाटतो - श्रीरंग काटेकर

■ गोवा येथे 'उद्योगरत्न' पुरस्काराने निलेश बळी सन्मानित



सातारा : 'उद्योगरत्न' पुरस्कार मिळाल्याबद्दल निलेश बळी यांचा सत्कार करताना श्रीरंग काटेकर, सोबत डॉ. अनिरुद्ध जगताप, विजय राजे.

**सातारा : प्रतिनिधी**

श्री गौरीशंकर डायग्नोस्टिक सेंटरच्या माध्यमातून आरोग्य सेवा क्षेत्रात भरीव कामगिरी करणारे श्री गौरीशंकर डायग्नोस्टिक सेंटरचे संचालक व युवा उद्योजक निलेश बळी यांच्या कार्याचा सार्थ अभिमान वाटतो, असे मत गौरीशंकरचे जनसंपर्क अधिकारी श्रीरंग काटेकर यांनी व्यक्त केले.

निलेश बळी यांना गोवा येथे सन २०२२-२३ मधील 'उद्योगरत्न' पुरस्काराने सन्मानित झाल्याबद्दल त्यांचा गौरीशंकर परिवारातर्फे सत्कार करण्यात आला. त्यावेळी काटेकर बोलत होते. यावेळी श्री गौरीशंकर डायग्नोस्टिक सेंटरचे संचालक डॉ. अनिरुद्ध जगताप, गौरीशंकर डी. फार्मसीचे प्राचार्य . विजय राजे आदी प्रमुख उपस्थित होते श्रीरंग काटेकर पुढे म्हणाले की निलेश बळी यानी प्रतिकूलतेवर मात करीत यश प्राप्त केले आहे त्यांना प्राप्त पुरस्कारामुळे गौरीशंकरचा नावलौकिक त्यांनी उंचावला आहे डॉ. अनिरुद्ध जगताप म्हणाले की आरोग्य तपासणीच्या क्षेत्रात उत्तम व्यवसायिक मूल्य जपताना निलेश बळी यांनी सामाजिकतेची ही भान ठेवले आहे. श्री गौरीशंकर डायग्नोस्टिक सेंटरचे संचालक निलेश बळी म्हणाले की पुरस्कारामुळे जबाबदारी वाढली आहे आरोग्य क्षेत्रात उत्तम सेवा देण्याबरोबरच रुग्णांना अधिक सहकार्य करण्याचा माझा मानस आहे. निलेश बळी यांचे गौरीशंकरचे अध्यक्ष मदनराव जगताप, श्री गौरीशंकर डायग्नोस्टिक सेंटरचे संचालक डॉ. गिरीश काकडे, डॉ. सुनील सरतापे, डॉ. प्रशांत इनामदार, डॉ. दीपक बागडे यांनी अभिनंदन केले.

**सातारासह संपूर्ण महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यात १२ निदान केंद्रे यशस्वीपणे चालवणाऱ्या निलेश बळी यांच्या कार्यकर्तृत्वाची दखल घेऊन 'उद्योगरत्न' पुरस्कार त्यांना प्राप्त झाला आहे. आरोग्य सेवा क्षेत्रात उत्तम सेवा देण्याबरोबर सामाजिक जाणीव ठेवून वाटचाल करणारे निलेश बळी यांनी असंख्य रुग्णांना मदतीचा हात दिला आहे. गोवा येथील एका विशेष कार्यक्रमात पद्मश्री डॉ. मुकेश बत्रा यांच्या हस्ते त्यांचा उचित सत्कार करण्यात आला.**

# राष्ट्रीय स्पर्धेत अभिलाषा लक्ष्मण वाघमारेला रौप्यपदक

**सातारा : प्रतिनिधी**

बिहार पाटना येथे आज झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत सातारा जिल्हा एथलेटिक्स संघटनेच्या वतीने सहभागी झालेली उदयोंन्मुख खेळाडू कु. अभिलाषा लक्ष्मण वाघमारे हिनी८० मीटर हर्डल मध्ये सिल्व्हर पदक मिळवले आहे.

अभिलाषा ही खेलो इंडिया एथलेटिक्स सेंटर साताराची खेळाडू असून के,एस, डी, शानभाग विद्यालय व ज्यु.कॉलेजची ती ९ वी अ मधील विद्यार्थीनी आहे. अभिलाषाने रौप्य पदक मिळवताना सुवर्णपदक मिळवणाऱ्या खेळाडूपेक्षा केवळ ०.१४ सेकंदाचा फरक ठेवत रौप्यपदक मिळवले. सुवर्णपदक मिळवणाऱ्या खेळाडूने १२.७८ सेकंदात तर अभिलाषाने १२.९२ सेकंदात ही स्पर्धा पूर्ण केली. अभिलाषा वाघमारे हिला श्री. बाबर यांनी मार्गदर्शन केले. या यशाबद्दल के.एस.डी.शानभाग



विद्यालय आणि जुनियर कॉलेजचे संस्थापक व ज्येष्ठ क्रीडा मार्गदर्शक रमेश शानभाग, संस्थेच्या संचालिका सौ.आंचल घोरपडे, मुख्याध्यापिका आणि प्राचार्य सौ .रेखा गायकवाड प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक भाग्येश कुलकर्णी तसेच पालक संघाचे अध्यक्ष प्रतिनिधी शिक्षक, शिक्षिका व पालकांनी या यशाबद्दल कौतुक करून भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# देशी गाय, बैल, अश्व, श्वान, शेळी, बोकडांचे जंगी प्रदर्शन अन् स्पर्धाही

## तब्बल ६९ लाखांची बक्षीसे, गाढवांचे देशातील पहिलेच प्रदर्शन कणेरी मठावर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

देशी प्रजातींच्या गाय ,म्हैशी, बकरी, अश्व, गाढव , कुत्रे व मांजर यांचे अनोखे प्रदर्शन कणेरी मठावर भरवण्यात येणार आहे. त्यामुळे देशी जातीच्याप्रजातींचे संगोपन व संवर्धनाची व्याप्ती वाढण्यास मदत होणार आहे. गाढव हा अतिशय उपयुक्त प्राणी असूनही तो दुर्मिळ होत असल्याच्या पार्श्वभूमीवर देशात प्रथमच त्यांचे प्रदर्शन भरविण्यात येणार आहे. प्रदर्शनाबरोबर प्रत्येक जनावरांच्या विविध गटात भव्य स्पर्धा होणार असून त्यासाठी ६९ लाखांची बक्षीसे देण्यात येणार आहेत. जनावरांच्या सौंदर्य स्पर्धेत सर्वात सुंदर जनावरांना २१ हजारापासून ते लाखापर्यंतची बक्षीसे देण्यात येणार आहेत.

पर्यावरण रक्षणाबरोबरच देशी प्रजातींच्या जनावरांचे संगोपन आणि संवर्धन करण्याच्या हेतुने सिद्धगिरी कृषी विज्ञान केंद्र व राज्य सरकारच्या पशू



संवर्धन विभागाच्या वतीने २१ ते २३ फेब्रुवारी दरम्यान हे प्रदर्शन भरविण्यात येणार आहे. देशभरातून त्याला अतिशय चांगला प्रतिसाद मिळत आहे. शेतकऱ्यांनी यासाठी मोठ्या प्रमाणात नावनोंदणी केली आहे. मठावर गोशाळा असून येथे हजारावर गायी आहेत. नुकतेच येथे भटक्या कुत्र्यांची शाळा सुरू करण्यात आली आहे. सुमंगलम् पंचभूत महोत्सवासाठी मोठ्या प्रमाणात शेतकरी येणार आहेत. त्यामुळे देशी प्रजातींच्या जनावरांचे भव्य प्रदर्शन हे महोत्सवाचे प्रमुख आकर्षण ठरणार आहे.

तीन दिवस होणाऱ्या या प्रदर्शनात गाय ,म्हैशी, बकरी, घोडे, गाढव , कुत्रे व मांजर यांचा सहभाग राहणार आहे. यासाठी भव्य मंडप उभारण्यात आला आहे. सर्वोत्कृष्ट गाय आणि बैलाला एक लाखाचे तर म्हैस व रेड्याला ५१ हजाराचे बक्षिस दिले जाणार आहे. मांजर, श्वान, शेळी, बोकड यांच्याही स्पर्धा घेतल्या जाणार आहेत. देशभरातील विविध जातींचे अश्व येथे पहायला मिळणार आहेत. देशी अश्व स्पर्धेत प्रथम क्रमांकास लाखाचे बक्षीस देण्यात येणार आहे. प्रत्येक जनावरांमध्ये नर व मादी अशा दोन गटात बक्षीसे दिली जाणार आहेत.

**गाढवांचे प्रदर्शन**

अलीकडे अतिशय दुर्मिळ होत असलेल्या गाढवांचेही येथे भव्य प्रदर्शन भरविण्यात येणार आहे. देशातील हे पहिलेच प्रदर्शन आहे. त्यांच्याही स्पर्धा घेण्यात येणार आहेत. देशी प्रजाती दुर्मिळ होत असल्याच्या पार्श्वभूमीवर हे प्रदर्शन अतिशय महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

# रहिमतपूरमध्ये मराठा बिझनेस फोरमचे उद्घाटन

## विद्यार्थ्यांनी देशसेवेसाठी सैन्यदलात सामील व्हावे : मेजर जनरल विजय पवार

**कोरेगाव : प्रतिनिधी**

भारतीय सैन्यदलापुढे शिवछत्रपतींचा आदर्श आहे. आपले सैन्यदल जगात नावाजलेले एक उत्तम सैन्यदल आहे. देशाची देशसेवा करण्यासाठी विद्यार्थ्यांनी सशस्त्र सैन्यदलात सामील व्हावे, असे आवाहन माजी मेजर जनरल विजय पवार यांनी केले.

रहिमतपूर येथे रहिमतपूर पंचक्रोशी मराठा बिझनेस फोरम शाखेचे उद्घाटन तसेच रहिमतपूर व परिसरातील सर्व शैक्षणिक संस्थातील आठवी ते बारावी विद्यार्थ्यांसाठी एन.डी.ए. आर्मी, नेव्ही, एअर फोर्स, एस.पी. आय. औरंगाबाद, एस.पी.पी. नाशिक याबाबाबतचे सविस्तर मार्गदर्शन करण्यासाठी ऑफिसर बनण्यासाठी आयोजित केलेल्या मार्गदर्शनपर कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर पंचक्रोशी शिक्षण मंडळाच्या अध्यक्षा सौ. चित्रलेखा माने-कदम, सौ. उषा पवार, माजी आयकर आयुक्त एम.बी.एफ.चे एक्झिक्यूटिव्ह प्रेसिडेंट अरुण पवार व हैदराबाद येथील एम.बी.एफ.चे संस्थापक व चेअरमन अगरवाल इंडस्ट्रीज बॉम्बेचे एम. मधू, सातारा जिल्हा बिझनेस फोरमचे युवा उद्योजक मनोज देशमुख, मराठा फोरमचे जगदीशभाऊ शिर्के, सक्सेस ॲबकसचे मालक किरण पाटील, एम.बी.एफ.चे सदस्य राजेंद्र साबळे, रहिमतपूर येथील मराठा बिझनेस फोरमचे नूतन अध्यक्ष हर्षवर्धन



मराठा बिझनेस फोरमच्या उद्घाटनप्रसंगी विजय पवार, अरुण पवार, सौ. चित्रलेखा माने – कदम, सौ. उषा पवार, हर्षवर्धन कदम, एम. मधू, मनोज देशमुख, जगदीशभाऊ शिर्के, किरण पाटील, राजेंद्र साबळे यांच्या समवेत, व्यावसायिक.

कदम, सचिव अच्युतराव माने यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

पुढे ते म्हणाले की, विद्यार्थ्यांनी दहावीनंतर एस.पी.आय., एन.डी.ए.ला प्रवेश घ्यावा. प्रवेश घेतल्यानंतर लेखी परीक्षेचा काळजीपूर्वक अभ्यास केला व मुलाखतीला आत्मविश्वासपूर्वक सामोरे गेलात तर तुम्ही यशस्वी व्हाल. यासाठी मला अधिकारी बनवायचे आहे, मी अधिकारीच बनणार असा आत्मविश्वास मनात असायला हवा. पूर्वी सैन्यदलात फक्त मुलांनाच जाता येत होते. पण यावर्षीपासून मुलींना संधी मिळू लागली आहे. या संधीचे सोने करा. या परीक्षेत यशस्वी होण्यासाठी महत्वकांक्षा, अभ्यासात निपुणता, इंग्रजी भाषेवर प्रभुत्व, शारिरीक सक्षमता, प्रभावी व्यक्तिमत्त्व अशा विविध गुणवैशिष्ट्यांची आवश्यकता असते असे त्यांनी नमूद केले.

सौ. चित्रलेखा माने-कदम म्हणाल्या की, मराठा बिझनेस फोरम हा आपल्या सर्वांचा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार उदात्त होते. आपण सर्वजण छत्रपतींचा विचार मानतो. या विचारांनी पुढे जातो. असा विचार ज्यांचा ज्यांचा आहे तो प्रत्येक जण मराठा. अशा या उदात्त विचारसरणीने आपण एकत्र काम करुया. एकमेकांच्या सहकार्याने पुढे जाऊया. मुलांना आर्मी, नेव्ही, एअरफोर्स, एन.डी.ए. एस.पी.आय, एस.पी.पी. अशा परीक्षेचे योग्यवेळी योग्य मार्गदर्शन मिळाले तर मुलांचे भवितव्य उज्ज्वल बनेल.

यावेळी अरुण पवार, मनोज देशमुख, अच्युतराव यांनी मनोगत व्यक्त केले. मान्यवरांच्या हस्ते मराठा बिझनेस फोरम रहिमतपूर शाखेचे उद्घाटन करण्यात आले. या फोरमच्या अध्यक्षपदी हर्षवर्धन कदम व सचिवपदी अच्युतराव माने यांची निवड करण्यात आली.

यावेळी पाहुण्यांचा हस्ते रहिमतपूर शहरातील विविध क्षेत्रात काम करणाऱ्या शिवराज माने, दत्तात्रय जाधव, नितीन जाधव, धनंजय माने, उदयन माने, विजय चव्हाण, सूर्यकांत पवार, वैभव माने, सतिश आडेकर, नितीन भोसले, संतोष नाईक या मराठा उद्योजकांचा प्रातिनिधिक स्वरूपात सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मराठा बिझनेस फोरमचे संस्थापक अध्यक्ष, मराठा महासंघाचे संस्थापक ॲड शशिकांत पवार यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. सतिश आडेकर यांनी देशभक्तीपर गीत सादर केले. डॉ. सुनंदा मोहिते यांनी सूत्रसंचालन केले. मराठा बिझनेस फोरम रहिमतपूर शाखेचे अध्यक्ष हर्षवर्धन कदम यांनी आभार मानले.

पंचक्रोशी शिक्षण मंडळ व मराठा बिझनेस फोरम रहिमतपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या या कार्यक्रमासाठी वसंतदादा पाटील शिक्षण संस्थेचे चेअरमन सुनील माने, सचिन बेलागडे, विक्रम माने, बेदील माने, जयवंत माने यासह विविध संस्थांचे पदाधिकारी, शिक्षक, पालक, सर्व शाळांतील एन. सी. सी. कॅडेट, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# गारवा बिर्याणीचे अनधिकृत नळकनेक्शन तोडले

## माजी नगराध्यक्ष स्मिता घोडके व नासिर शेख यांची आक्रमक भूमिका

**सातारा : प्रतिनिधी**

रविवार पेठेतील पाणीटंचाईसाठी जबाबदार ठरलेल्या गारवा बिर्याणी शॉप च्या अर्धिकृत नळ कनेक्शनला माजी नगरसेवकांच्या आक्रमक भूमिकेमुळे पालिकेला तोडावे लागले. पाणीपुरवठा विभागाने हे नळ कनेक्शन तात्काळ बंद करून टंचाई ग्रस्त भागातील नागरिकांना दिलासा दिला आहे.

रविवार पेठ येथील गीते वखार ते त्या भागातील नागरिकांना गारवा बिर्याणीला अनधिकृत नळ कनेक्शन दिल्याने पाणीटंचाईची समस्या निर्माण झाली होती याप्रकरणी संबंधित नागरिकांनी आक्रमक होत पाणीपुरवठा अभियंता शहाजी वाठारे यांना घेराव घातला होता या गोष्टीची खबर मिळताच माजी नगराध्यक्ष स्मिता घोडके व माजी नगराध्यक्ष नाशिक यांनी यासंदर्भात प्रशासनाला थेट फोन करून पाणीपुरवठा विभागाच्या पथकाला घटनास्थळी येण्यास भाग पाडले तसेच संबंधित नागरिक आणि माजी नगरसेवकांच्या उपस्थितीत वादाला कारणीभूत ठरलेले अनधिकृत नळ कनेक्शन ताबडतोब बंद करण्यात आले.

या रोखठोक आणि आक्रमक भूमिकेमुळे संबंधित टंचाईग्रस्त भागातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला नागरिकांचा प्रश्न तातडीने सोडवल्याबद्दल दोन्ही पदाधिकाऱ्यांचे आभार मानण्यात आले मात्र या निमित्ताने पाणीपुरवठा विभागाचा सावळा गोंधळ या प्रकरणामुळे चर्चिला जात आहे थेट पाईपलाईन वरून पाऊण इंची कनेक्शन कसे देण्यात आले यामागे कळीचा नारद कोण होता या प्रकरणाची आता चर्चा सुरू झाली आहे.

# प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडून ऑटोरिक्षा भाडेवाढीस मान्यता

**सातारा :** विविध ऑटोरिक्षा संघटना यांनी केलेल्या मागणीवरुन प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, सातारा यांनी परिचलन बैठकीत फेर विचार करुन ऑटोरिक्षा भाडे दरात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, असे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद चव्हाण यांनी कळविले आहे.

ऑटोरिक्षाकरिता प्रतिकिमी देय भाडे रु.२०.०८ पूर्णांकात देय भाडे रु.२०.०० ऑटोरिक्षाकरिता किमान देय भाडे १.५ कि.मी. साठी किमान देय भाडे रु.३०.१२ पूर्णांकात देयक भाडे रु.३०.००. रात्री ११.०० ते पहाटे ०५.०० या कालावधीसाठी आकरावयाचे अतिरिक्त भाडे ४० टक्के निश्चित करण्यात आले आहे. १४ किलोपर्यंतच्या नगास भाडे आकारण्यात येणार नाही तथापी त्यापेक्षा जास्त वजनाच्या प्रत्येक नगास ०३.०० आकारण्यात येईल. सुधारीत भाडे दर अंमलबजावणीकरिता दिनांक १६ फेब्रुवारी २०२३ च्या पहाटेपासून लागू होईल. ज्या रिक्षाचे मिटरचे नवीन दराने कॅलिब्रेशन होऊन मिटर सिल झाले आहे त्यानांच नवीन दराने भाडे स्विकारता येईल. कॅलिब्रेशन व मीटर सिल होईपर्यंत जुन्या दरानेच भाडे स्विकारावयाचे आहे. भाडे रचना सुधारणा करण्यासाठी मीटरच्या पुनर्प्रमाणिकरणास दिनांक १६ फेब्रुवारी ते १ एप्रिल २०२३ इतका पंचेचाळी दिवसांचा कालावधी आहे. सातारा जिल्ह्यात ज्या ठिकाणी जास्त रिक्षा प्रवासी वाहतूक आहे त्या त्या ठिकाणी रिक्षा भाडे प्रदर्शित करावे.

# तांबमळा-फरांदवाडी येथे धारदार शस्त्रांनी एकावर हल्ला

**फलटण : प्रतिनिधी**

तांबमळा-फरांदवाडी, ता. फलटण येथे अज्ञात चार ते पाच जणांनी रात्रीच्या वेळी धारदार शस्त्राने एकास गंभीर मारहाण केली असून यात एक जण गंभीर जखमी झाले असून याप्रकरणी शहर पोलीस ठाण्यात उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्यात आला नाही.

घटनास्थळावरून मिळालेल्या माहितीनुसार, दि. १३ रोजी मध्यरात्री १२ ते १ वाजण्याच्या सुमारास तांबमळा-फरांदवाडी, ता. फलटण येथे राहणारे मनीष प्रकाश ओझर्डे (वय ४५ रा. तांबमळा फरांदवाडी ता. फलटण) हे त्याची पत्नी घरात झोपले गेले असताना अज्ञात चार ते पाच जणांनी घराबाहेर येवून मनीष प्रकाश ओझर्डे यांना दार उघडून बाहेर येण्यास सांगितले असता मनीष प्रकाश ओझर्डे हे घराबाहेर आले नाहीत. यानंतर अज्ञात चार ते पाच जणांनी दारावर दगड घालून दार तोडू अशी धमकी दिली असता मनीष प्रकाश ओझर्डे हे दरवाजा उघडुन घराबाहेर आले असता तोड बाधून हातात धारधार शस्त्र घेऊन उभे असणार्या अज्ञात चार ते पाच जणांनी मनीष प्रकाश ओझर्डे यांना धारदार शस्त्राने मारहाण करण्यास सुरुवात केली. यावेळी घरात पत्नी व्यतिरिक्त कोणीही नसल्याने त्यांना वाचण्यास कोणी आले नाही. या मारहाणीत मनीष प्रकाश ओझर्डे यांना गंभीर मारहाण करत हातावर दोन ठिकाणी गंभीर वार केले. यानंतर आरडाओरड झाल्याने शेजारील काही अंतरावर राहत असलेल्या काही लोकांनी मनीष प्रकाश ओझर्डे यांच्या घराकडे धाव घेतली असता मारहाण करणार्या अज्ञात चार ते पाच जणांनी घटनास्थळावरून पळ काढला.

यानंतर शेजारील लोकांनी रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या गंभीर जखमी असलेल्या मनीष प्रकाश ओझर्डे यांना रुग्णालयात दाखल केले. जखमी मनीष प्रकाश ओझर्डे यांच्यावर शहरातील एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सदर घटनेबाबत शहर पोलीस ठाण्यात उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्यात आला नव्हता. सदर हल्ला दरोडा टाकण्याच्या हेतूने की इतर कोणत्या कारणासाठी करण्यात आला याची महिती अद्याप मिळाली नसून या घटनेमुळे तांबमळा परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सदरच्या घटनेचा तपास करत गंभीर मारहाण करणार्या आरोपींना तत्काळ अटक करण्याची मागणी तांबमळा परिसरातील ग्रामस्थांनी केली आहे.

# शिवजयंती निमित्त कलम ३६ लागू

**सातारा :** सातारा जिल्ह्यात १९ फेब्रुवारी २०२३ रोजी शिवजयंती उत्सव साजरा करण्यात येणार आहे. या अनुषंगाने मिरवणूक कोणत्या मार्गाने व कोणत्या वेळी काढावी किंवा काढू नये, मिरवणुकीतील व्यक्तींचे वर्तन कसे असावे, मिरवणुकीच्या व जमावांच्या प्रसंगी कोणत्याही रस्त्यावरुन किंवा सार्वजनिक जागी किंवा सार्वजनिक गर्दी होणार असेल किंवा अथडळा होणार असेल अशा सर्व प्रसंगी अडथळा होऊ न देणेकरिता ढोल, ताशे इतर वाद्ये वाजवण्याचे विनियमन करुन नियंत्रण आणि ध्वनी प्रदूषणाचे अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालयाने घातलेल्या निर्बंधाचे पालन व्हावे या करिता पोलीस अधीक्षक समीर शेख यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३६ नुसारचे अधिकार दि. १९ फेब्रुवारी २०२३ च्या १२ वाजेपर्यंत पर्यंत च्या कालावधीकरिता प्रदान केले आहे.

# सूरज बोडरे व त्याच्या १२ साथीदारांना मोक्का

## फलटण तालुक्यात टोळीची दहशत : गंभीर गुन्हे होते दाखल

**फलटण : प्रतिनिधी**

खुनाचा प्रयत्न, दरोडा, खंडणी, जबरी चोरी असे गंभीर गुन्हे दाखल असणाऱ्या फलटण येथील सराईत गुंड सूरज बोडरे व त्याच्या १२ साथीदारांविरुध्द पोलीस अधीक्षक समीर शेख यांनी मोक्का कायद्यांतर्गत कारवाई केली आहे.

सूरज वसंत बोडरे (वय २३, रा. ५ सर्कल, खामगाव, ता. फलटण), ज्ञानेश्वर उर्फ नन्या वसंत बोडरे (वय २८, रा. पाच सर्कल, खामगाव, ता. फलटण), उमेश संजय खोमणे (वय - २६ वर्ष, रा. गाडगेमहाराज आश्रमशाळेच्या समोर, खराडवाडी), रणजित कैलास भंडलकर (रा. होळरोड, खामगाव), अमर संतोष बोडरे, (रा. पिंपळवाडी, ता. फलटण), सचिन दत्तात्रय मंडले (रा. गणेशनगर, साखरवाडी), तानाजी नाथाबा लोखंडे (वय ३० वर्षे, रा. खामगाव), शरद उर्फ बाबू नंदकुमार पवार (वय २० वर्षे, रा. पाच सर्कल, खामगाव), शंभू आनंदा ननावरे (वय २२ वर्षे, रा. पाच सर्कल, खामगाव), वैभव हणमंत चव्हाण (वय २६ वर्षे), सनी मोहन बोडरे (वय २६ वर्षे), श्रीकांत गुलाब बोडरे (वय ३८ वर्षे, रा. पाच सर्कल खामगाव), गणेश बाळू मदने (वय १८ वर्ष २ महिने, रा. खामगाव) अशी त्यांची नावे आहेत.

टोळी प्रमुख सूरज बोडरे व त्याच्या १२ साथीदारांविरुध्द पोलीस ठाण्यात खुनाचा प्रयत्न, दरोडा, खंडणी, जबर दुखापत घडवून आणण्याच्या प्रयत्नासह दरोडा, जबरी चोरी, अपनयन, जबर दुखापत, बेकायदेशीर जमाव जमवून मारहाण, शिवीगाळ, दमदाटी, अपहरण, आर्म ॲक्ट अशा प्रकारचे गंभीर स्वरूपाचे अनेक गुन्हे दाखल होते. टोळीप्रमुख सूरज बोडरे याने टोळीची दहशत पसरविण्यासाठी फलटण तालुक्यातील इतर गुन्हेगारी टोळीतील सदस्यांना एकत्र केल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे पोलीस निरीक्षक धन्यकुमार गोडसे यांनी टोळीविरुद्ध दाखल गुन्ह्यांची माहिती संकलित करून आरोपींविरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियमान्वये कारवाईकरीता पोलीस अधीक्षक सातारा यांच्यामार्फत विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र यांच्याकडे मोक्काअंतर्गत कारवाईसाठी प्रस्ताव सादर केला होता.

या प्रस्तावास विशेष पोलीस महानिरीक्षक कोल्हापूर परिक्षेत्र सुनिल फुलारी यांनी मंजुरी दिली आहे. मोक्का कायद्याची कलमे लावून तपास उपविभागीय पोलीस अधिकारी तानाजी बरडे, फलटण उपविभाग, फलटण यांच्याकडे देण्यात आला आहे. नोव्हेंबर २०२२ पासून एकूण ४ मोक्का प्रस्तावांमध्ये ४४ जणांना मोक्काअंतर्गत कारवाई फलटण ग्रामीण पोलीस ठाणेचे पोलीस अंमलदारमार्फत करण्यात आली आहे.

मोक्का प्रस्ताव मंजुरीकरीता पोलीस अधीक्षक समीर शेख, अपर पोलीस अधीक्षक बापू बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी तानाजी बरडे, पोलीस निरीक्षक अरुण देवकर (स्थानिक गुन्हे शाखा), पोनि. धन्यकुमार गोडसे, पोलीस उपनिरीक्षक सागर अरगडे, पोलीस उपनिरीक्षक गणेश माने, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अंमलदार अमित सपकाळ, संजय राऊत, वैभव सूर्यवंशी, अमोल जगदाळे, अभिजित काशिद, अजय कडेकोट, स्वप्निल खराडे यांनी मोक्का कारवाईकरीता सहभाग घेतला आहे.

# लोककलांसह सांस्कृतिक कार्यक्रमांची सात दिवस पर्वणी...








**कोल्हापूर : प्रतिनिधी**

देशाच्या विविध प्रांतातील लोककला, लोकसंस्कृती यासह सात दिवस विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची पर्वणीच उपस्थितांना मिळणार आहे. हजारो कलावंत यामध्ये सहभागी होणार असून रोज सायंकाळी भव्य सभामंडपात हे कार्यक्रम पहायला मिळतील. याशिवाय काही व्यासपीठावर दिवसभर देशाच्या विविध राज्यातून आलेले कलाकार आपली कला सादर करणार आहेत.

कणेरी मठावर २० ते २६ फेब्रुवारी दरम्यान होणाऱ्या सुमंगलम पंचभूत लोकोसवात रोज सायंकाळी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. देशभरातील संस्कृतीचे या माध्यमातून दर्शन घडविण्यात येणार आहे. यामध्ये महाराष्ट्रातील अनेक लोककला सादर होणार आहेत. त्यामध्ये जागर लोककलेचा, महाराष्ट्राची लोकधारा, वाद्य महोत्सव, वाद्य जुगलबंदी आणि लोकनृत्य, शिवराष्ट्र, शिवगर्जना अशा अनेक कार्यक्रमांचा समावेश आहे.

रोज देशाच्या विविध प्रांतातील नामवंत कलावंत आपली लोककला सादर करतील. त्यामध्ये केरळ, कर्नाटक, तामिळनाडू, राजस्थान, आसाम, गुजरात यासह अनेक राज्यातील लोककलांचा समावेश आहे. कार्यक्रमासाठी उभारण्यात आलेल्या भव्य सभामंडपात रोज सायंकाळी पाच नंतर हे कार्यक्रम होतील. याशिवाय काही मुक्त व्यासपीठ उभारण्यात आले आहेत. तेथे दिवसभर कलावंत आपली कला सादर करणार आहेत. या निमित्ताने देशाच्या सांस्कृतिक ऐक्याचे दर्शन मठावर घडविण्यात येणार आहे.

**महोत्सवातील कार्यक्रम असे :** २० फेब्रुवारी - जागर लोककलेचा (सहभाग गणेश चंदनशिवे, उर्मिला धनगर, देवानंद माळी, मीरा उमप, कडूबाई खरात)

२१ फेब्रुवारी - महाराष्ट्राची लोकधारा (सहभाग.. कृष्णा कदम व त्यांचे सहकारी )

२२ फेब्रुवारी - वाद्य महोत्सव (सहभाग.. संदीप पाटील आणि दुर्मिळ वाद्य वाजविणारे कलाकार )

२३ फेब्रुवारी - वाद्य जुगलबंदी आणि लोकनृत्ये (सहभाग.. उदय साटम व सहकारी)

२४ फेब्रुवारी - शिव महाराष्ट्र (सहभाग.. अमेय पाटील व त्यांचे सहकारी )

२५ व २६ फेब्रुवारी - शिवगर्जना

### दहा लाखांवर विद्यार्थ्यांची उपस्थिती

**पर्यावरण जागृतीसाठी आयोजित केलेल्या या लोकोत्सवास राज्यभरातील दहा लाखावर शालेय विद्यार्थी भेट देणार आहेत. आठवी, नववी व अकरावीच्या सर्व विद्यार्थ्यांनी यामध्ये भाग घ्यावा असे नियोजन राज्याच्या शिक्षण विभागाने केले आहे. कोल्हापूर जिल्ह्यातून रोज एक दोन तालुक्यातील विद्यार्थी येतील. या सर्व विद्यार्थ्यांची जेवणाची सोय मठावर करण्यात आली आहे.**

# सिद्धगिरी मठातील सुमंगलम महोत्सवाला छत्रपती घराण्याच्या वतीने सर्वतोपरी सहकार्य

## माजी आमदार मालोजीराजे छत्रपती यांची ग्वाही

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

सुमंगलम पंचभूत लोकोत्सवच्या निमित्ताने कणेरी मठावर पर्यावरण जनजागृतीचे अतिशय महत्त्वाचे काम सुरू आहे, याबाबत मठाचे कौतुक करावे तेवढे थोडे असून छत्रपती घराण्याच्या वतीने या महोत्सवाला सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन माजी आमदार मालोजीराजे छत्रपती यांनी दिले.

सिद्धगिरी मठ येथे होणाऱ्या सुमंगलम महोत्सवाची तयारी सध्या अंतिम टप्प्यात आहे. मंगळवारी मालोजीराजे यांच्यासह डॉ. डी. वाय. पाटील प्रतिष्ठानचे विश्वस्त पृथ्वीराज पाटील, माजी आमदार संजय घाटगे, जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या अंजना रेडेकर, माजी नगरसेवक अर्जुन माने, शिवसेनेचे प्रा. सुनील शिंत्रे डॉ. संपतकुमार यांच्यासह अनेकांनी मठाला भेट दिली. पंचभूत महातत्वाच्या सर्व मंडपाची, सेंद्रिय शेती, सोळा संस्कार व भव्य सभा मंडप स्टॉल यांची त्यांनी पाहणी केली. अतिशय वेगाने सुरू असलेल्या तयारीबद्दल समाधान व्यक्त केले. डॉक्टर संदीप पाटील प्राचार्य मधुकर बाचुळकर अशोक वाली उदय गायकवाड राजू लिंग्रज,प्रताप कोंडेकर यांनी त्यांना माहिती दिली.

मालोजीराजे म्हणाले, पूज्यश्री काडसिद्धेश्वर स्वामींच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरण जागृतीचे काम अतिशय चांगले सुरू आहे. शिवाजी महाराज आणि शाहू महाराजांच्या पर्यावरण प्रेमी विचारांचा जागर शोभा यात्रेच्या निमित्ताने केला जाणार आहे, हे कौतुकास्पद आहे. जनतेच्या हितासाठी आणि पर्यावरण जागृतीसाठी सिद्धगिरी मठाच्या वतीने जे कार्य सुरू आहे.

यावेळी संयुक्त राजारामपुरी मंडळाचे पदाधिकारी काका जाधव, आलोक पाटील, कमलाकर जगदाळे ,संजय काटकर ,दुर्गेश लिंग्रज, नितीन पाटील, अमर निंबाळकर, अनुप पाटील यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# पिंपोडे बुद्रुक येथील टायरच्या दुकानाला भीषण आग

## आगीत दोन दुचाकी जळून खाक; पोलिसांच्या व ग्रामस्थांच्या मदतीने आग आटोक्यात



**वाठार स्टेशन : प्रतिनिधी**

कोरेगाव तालुक्यातील पिंपोडे बुद्रुक येथील टायरच्या दुकानाला आज दुपारी ३:३० वाजण्याच्या सुमारास भीषण आग लागली.

या आगीमध्ये शेजारी असणाऱ्या टू व्हीलर गॅरेजमध्ये लावलेल्या दोन दुचाकी जळून खाक झाल्या. आग एवढी भीषण होती की रस्त्यावरून येणाऱ्या जाणाऱ्यांना आगीमुळे तब्बल अर्धा तास थांबावे लागले. वाठार स्टेशन पोलिसांना ही बातमी समजतात त्यांनी लगेच घटनास्थळावर धाव घेत ग्रामस्थांच्या मदतीने आग आटोक्यात आणली.

घटनास्थळावरून मिळालेल्या माहितीनुसार, दुपारच्या दरम्यान कोणीतरी व्यक्तीने आजूबाजूचे गवत पेटवण्यासाठी ही आग लावल्याचे समजते व याच आगीमुळे शेजारी असणाऱ्या टायरच्या दुकानाला भीषण अशी आग लागली व याआगीने एवढे रौद्ररूप धारण केले होते की यामध्ये शेजारी असणारे दुचाकी गॅरेजही पेटले व यात असणाऱ्या दोन दुचाकी गाड्याही आगीत भस्मसात झाल्या.

पोलिसांच्या व पिंपोडे बुद्रुक ग्रामस्थांच्या कार्य तत्परतेमुळे तब्बल दीड तासाच्या अथक परिश्रमानंतर आग आटोक्यात आणण्यात मदत झाली. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. तसेच या आगीमुळे सर्व पिंपोडे बुद्रुक परिसरात काळा धूर पसरल्याचे चित्र दिसून येत होते.

# ऊस वाहतूक मजुरांना न्याय द्या, अन्यथा स्वस्थ बसणार नाही

## खासदार राजू शेट्टी : मुकादम व्यवस्था मोडून महामंडळ स्थापन करा

**सांगली : प्रतिनिधी**

ऊस तोडणी व्यवस्थेत ऊस वाहतूकदार यांची लूट होत आहे, मुकादम ऐवजी महामंडळामार्फत नियोजन करावे, ऊस मुकादम हे स्थानिक पातळीवर नेते असतात. त्यांच्याकडून गेल्या दोन वर्षात ४४६ कोटी रुपयांची लूट केली आहे. याबाबत पंधरा दिवसात निर्णय घ्यावा, अन्यथा आम्ही स्वस्थ बसणार नाही, असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे माजी खासदार राजू शेट्टी यांनी पत्रकार परिषदेत दिला. यावेळी भाजपचे नेते पृथ्वीराज पवार, संदीप राजोबा उपस्थित होते.

माजी खासदार राजू शेट्टी म्हणाले, २९ नोव्हेंबर रोजी मुख्यमंत्र्यांसोबत बैठकीत ऊस वाहतुकदारांचा विषय चर्चेला आला, हिवाळी अधिवेशनात चर्चा झाली, त्यातून सहकार खात्याने जी माहीती संकलित झाली, त्यातून धक्कादायक माहिती समोर आली, साखर उद्योगामध्ये वाहतुकदारांना कोणतीही किंमत नाही असे दिसते, शेतकऱ्याचे बील थकल्यास तरतूद आहे, मात्र ऊस वाहतुदराचे पैसे बुडल्यास कोणतीही तरतूद नाही, म्हणून यामध्ये आता सरकारनेच पुढाकार घेऊन त्याबाबत तोडगा काढणे गरजेचे आहे.

१०, २५८ मुकादमांनी वाहतूकदारांची फसवणूक केली असल्याची माहिती साखर आयुक्त कार्यालयाने सांगितली आहे. ४४६ कोटी रुपयांची रक्कम दोन वर्षात बुडाली आहे. कारखाना वाहतूकदारांना हमीपत्र देतात, त्यावर बँक त्यांना कर्ज देतात, मात्र आता ती रक्कम पुरेशी नसल्याने उर्वरित पन्नास टक्के रक्कम वाहतूकदार इतर कर्ज काढून पैसे उभा करतो, म्हणजेच प्रत्यक्ष लूट झालेली रक्कम हजार कोटी रुपयांपेक्षा मोठी आहे. म्हणून आम्ही ऊस वाहतूकदार संघटनेच्या माध्यमातून या वितोधात आवाज उठवणार आहोत.



**खोटे गुन्हे दाखल होतात**

वाहतूकदार यांची मुकदमांनी रक्कम लुटलेले पैसे मागितल्यावर त्यांच्यावर विनयभंग, सावकारीसारखे गुन्हे दाखल होतात. यातून बाहेर पडण्यासाठी पुन्हा त्यांना खर्च होतो, कायदे वापरावेत, मात्र त्याचा दुरूपयोग होणार नाही, याची काळजी पोलीस प्रशासनाने घ्यावी अशी मागणी करीत आहोत.

**मागण्या**

मुदतपूर्व कर्ज वसुली थांबवा, कर्जाचे पुनर्गठन करा, फसवणूक करणाऱ्या मुकादमाना ब्लॅक लिस्ट करा, विशेष पोलीस पथक तयार करून आशा फसवणूक करणाऱ्यांच्या मुसक्या आवळा

**केंद्र आणि राज्य शासनाची जबाबदारी**

केंद्र आणि राज्य शासनाला या जवाबदरीतून मुक्त होता येणार नाही, कायद्यानुसार शासनाने अकुशल ऊस कामगारांना संरक्षण द्यावे लागेल, १३ कोटी २० लाख टन तोड झाली तर ४२९० कोटी रुपयांचा रोजगार निर्माण झाला आहे. त्यामुळे आता याबाबत शासनाने गांभीर्याने निर्णय घेणे अपेक्षित आहे.

**वीज दरवाढीविरोधात मंगळवारी रास्ता रोको**

माजी खासदार राजू शेट्टी म्हणाले, महावितरण कंपनीने ३७ टक्के वीज दर वाढ सुचवली आहे. त्याबाबत आम्ही हरकती नोंदवल्या आहेत, एकीकडे दरवाढ करताना राज्यातील फक्त पाच जिल्ह्यात दिवसा वीज दिली जात नाही, किमान वन्यप्राणी अस्तित्व असणाऱ्या जिल्ह्यात तर दिवसा वीज द्यायला हवी होती, अनेक शेतकऱ्यांनी आपला जीव गमावला आहे, याला केवळ सरकार जबाबदार आहे. शेतकऱ्यांना दिलेले वीजबिल ही सदोष असल्याचे कंपनीने यापूर्वीच सत्यशोधन समितीपुढे मान्य केलं आहे, केवळ थकबाकीचा आकडा दाखवून वीज तोडली जाते. जी वीज वापरली नाही, त्याचे अंदाजे रक्कमेचे वीजबिल देते, सरकार कडून देखील अनुदान घेतात, म्हणजेच न वापरलेल्या विजवेवर कंपनीने सरकारी तिजोरीवर दरोडा टाकला आहे, म्हणून दि. २२ रोजी दुपारी १२ नंतर आम्ही रस्ता रोको करणार आहोत. विमा, अतिवृष्टी असे पैसे शेतकऱ्यांना मिळालेले नाहीत, याकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी आम्ही राष्ट्रीय महामार्ग वगळता इतर ठिकाणी रस्ता रोको करणार आहोत.

# म्हसवड पोलीस व स्थानिक गुन्हे शाखेच्या संयुक्त कारवाईत तब्बल १ कोटीचा गांजा जप्त

**म्हसवड : प्रतिनिधी**

म्हसवड पोलीस स्टेशन हद्दीतील खडकी गावच्या परिसरातील एका मका डाळिंब शेतातून तब्बल एक कोटी किमतीचा गांजा हस्तगत करण्यात म्हसवड पोलीस व सातारा स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे. ही कारवाई सोमवारी रात्री १ वाजेपर्यंत सुरू होती. विशेष म्हणजे महिन्याभरातच म्हसवड पोलीस स्टेशन हद्दीत गांजाची लागवड करणाऱ्यांवर पोलीसांची ही दुसरी कारवाई झाली असुन आजवरची ही सर्वात मोठी कारवाई असल्याचे बोलले जात आहे, सलग दोन मोठ्या कारवायामुळे म्हसवड परिसर पुन्हा एकदा चांगलाच ढवळुन निघाला आहे.

सदरच्या कारवाईबाबत सुत्रांकडून समजलेली अधिक माहिती पुढीलप्रमाणे म्हसवड पोलीस स्टेशन हद्दीतील खडकी पाटोळ याठिकाणी कुंडलिक नामक मुकादमाने झटपट श्रीमंत होण्याच्या मोहापायी आपल्या डाळींब लावलेल्या शेतात चक्क गांजाची लागवड केली यातुन आपण रग्गड पैसा मिळवु असे उराशी स्वप्न बाळगुन अय्याशी जिवन जगणाऱ्या कुंडलिकाची बदललेली जिवनशैली पोलीसांच्या नजरेस खडकली त्यांनी याबाबत आपले जाळे विणले असता त्यामध्ये संबधित इसम अलगद अडकला अन पोलीसही चक्रावुन गेले, तब्बल १ कोटी रुपये किमतीचा गांजाची लागवड या बहाद्दराने आपल्या शेतामध्ये केल्याचे उघडकीस झाल्यावर पोलीसही अवाक झाले.



गांजा लागवड करणारा इसम गेल्या तीन चार वर्षापासून थोड्या फार प्रमाणात गांजाची लागवड करीत असून त्यातून त्याला नफा मिळत असल्याने यंदा त्याने जोमात लागवड केली असल्याची माहिती मिळत आहे. कमी कष्टात भरगच्च माल्टा मिळवण्याच्या नादात तो अलगद पोलिसांच्या हाती लागला अन त्याचे पितळ उघडं पडले आहे.

म्हसवड परिसरात गांजा विक्रीचे मोठे रॅकेट असावे, या रॅकेटच्या संपर्कात कुंडलिक आला असावा, इतर ठिकाणीही हा गांजा वितरीत केला जात असावा, अशी शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. कुंडलिक यास अटक केल्यानंतर गांजा नेमका कुठे आणि कसा वितरीत होतो, याचा म्होरक्या कोण? असा सर्व प्रश्नांचा उलगडा होणार आहे. सदर प्रककणी कुंडलीक खांडेकर यास पोलीसांनी ताब्यात घेतले आहे. म्हसवड पोलिसांनी अशा अवैध्य गांजा खरेदी करणाऱ्या सुत्रधारापर्यंत पोहचून अशा बहाद्दरांचा समूळ नायनाट करण्याची मागणी जोर धरत आहे. तर महिन्याभरातच म्हसवड पोलीस स्टेशन हद्दीत गांजावर दुसऱ्यांदा कारवाई झाल्याने एकच खळबळ उडाली आहे.

# शास्ती कमी करून मूळ थकबाकीचा भरणा

## अकलूज नगरपरिषदेच्या निर्णयाचा ३९८ नागरिकांनी घेतला फायदा

**अकलूज : प्रतिनिधी**

अकलूज ग्रामपंचायतचे नगरपरिषदेत रूपांतर झाल्यानंतर नगरपरिषद अधिनियमाप्रमाणे थकीत मालमत्ता कर प्रती महिना दोन टक्के क्षेत्राप्रमाणे शास्ती आकारण्यात आली होती. सदरची शास्तीची रक्कम मोठया प्रमाणावर वाढत गेल्याने नागरिकांच्या मागणीनुसार लोक अदालत मध्ये शास्ती कमी करून मूळ रक्कम मुद्दल भरणे बाबत लोक अदालतमध्ये मांडण्यात आले होते. त्यानुसार संबंधितांना नोटीस दिल्या होत्या.याचा ३९८ नागरिकांनी फायदा घेतलेला आहे.

सदरील शास्ती कमी करून मूळ थकबाकी भरण्यात आलेली आहे. त्यानुसार थकीत मालमत्ता कर ६४ लाख रुपये, थकीत पाणीपट्टी कर ४ लाख रुपये तसेच थकीत गाळे भाडे ४ लाख रुपये असे एकूण थकीत कर ७२ लाख रूपये वसूल करण्यात आले आहे. तसेच जे थकबाकी असणारे नागरिक यांनी लोक अदालत मध्ये आले नाहीत.अशा सर्व नागरिकांनी आपला थकीत कर मार्च अखेर पर्यंत हप्त्यामध्ये भरावा. ज्या नागरिकांचे थकीत कर आहे त्यांच्यावर नळ कनेक्शन तोडणी, गाळे सील करणे, जप्ती करणे या प्रकारे कारवाई करण्यात येणार आहे. तरी थकीत कर असणाऱ्या नागरिकांनी आपला थकीत कर भरून नगरपरिषदेस सहकार्य करावे.

# राज ठाकरे मोठ्या भावासारखे माझ्या पाठीशी उभे राहिले, त्यांनी शब्द पाळला

## अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी मानले आभार

**पिंपरी : प्रतिनिधी**



चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने पाठिंबा जाहीर केल्याबद्दल भाजप व मित्रपक्षाच्या उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी मनसेप्रमुख राज ठाकरे, मनसेचे शहराध्यक्ष सचिन चिखले व त्यांच्या वरिष्ठ नेत्यांचे आभार मानले आहेत. पतीच्या निधनाचे दुःख अजून विरलेही नसताना पोटनिवडणुकीला सामोरे जाण्याची वेळ माझ्यावर आली. अशा कठीण प्रसंगी महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि त्या पक्षाचे प्रमुख राज ठाकरे हे मोठ्या भावासारखे माझ्या पाठीशी उभे राहिले आहेत. त्यांच्या या पाठिंब्याबद्दल मी त्यांची कायम ऋणी राहीन, अशा भावना अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी व्यक्त केल्या आहेत.

यासंदर्भात अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे, माझे पती आणि शहराच्या विकासाचे शिल्पकार आमदार लक्ष्मण जगताप यांचे ३ जानेवारी रोजी निधन झाले. त्यांच्या निधनामुळे आम्हा जगताप परिवारावरच नाही तर चिंचवड विधानसभा मतदारसंघातील प्रत्येकांवर दुःखाचे डोंगर कोसळले. या दुःखातून सावरण्यासाठी राज्यातील आणि शहरातील अनेक नेत्यांनी, विविध क्षेत्रातील मान्यवरांनी व नागरिकांनी आम्हाला आधार दिला. आमच्या कुटुंबाची भेट घेऊन सांत्वन केले. मनसेप्रमुख राज ठाकरे यांनीही आमच्या घरी येऊन दिवंगत लक्ष्मण जगताप यांना श्रद्धांजली वाहिली. तसेच माझ्याशी संवाद साधून कोणत्याही प्रसंगात भावासारखे पाठीशी उभे राहण्याचे वचन त्यांनी मला दिले होते.

राज ठाकरे यांनी मला दिलेले हे वचन आज पाळले आहे. कारण त्यांनी पोटनिवडणुकीत भाजपाला म्हणजे मला पाठिंबा जाहीर केला आहे. मनसेचे नेते अनिल शिदोरे, बाबू वागस्कर, किशोर शिंदे यांनी भाजपाचे शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे, पक्षाचे प्रवक्ते एकनाथ पवार आणि प्रदेश सदस्य अनुप मोरे यांच्यासोबत बैठक घेऊन मनसेचा पाठिंबा दिला आहे. राज ठाकरे हे राज्यातील एक मोठे नेते आणि मनही मोठे असणारे नेते आहेत. त्यांच्यातील मोठेपणामुळेच चिंचवड पोटनिवडणुकीत मला त्यांनी पाठिंबा जाहीर केला आहे. त्याबद्दल मी राज ठाकरे यांची कायम ऋणी राहीन.

# मनसेचा पोपट नाचतो 'ईडी'च्या तालावर

## राष्ट्रवादी काँग्रेसचा आरोप

**पुणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने पुण्यातील पोटनिवडणुकीत भारतीय जनता पक्षाला पाठिंबा दिल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसने त्यांच्यावर कठोर टीका केली आहे. मनसेचा पोपट सक्तवसुली संचालनालयाच्या तालावर नाचत असल्याचा आरोप पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी ट्विटरद्वारे केला आहे.

कसबा आणि चिंचवड विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत त पहिल्या टप्प्यामध्ये मनसेने तटस्थ राहण्याची भूमिका घेतली होती. पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी कोणत्याही पक्षाच्या अथवा अपक्ष उमेदवाराच्या प्रचारात सहभागी होऊ नये असे आदेश मनसेचे प्रमुख राज ठाकरे यांनी दिले होते.

भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांनी ठाकरे यांची भेट घेऊन या दोन्ही मतदारसंघात मनसेने भाजपाला पाठिंबा द्यावा अशी मागणी केली. या विनंतीला मान देऊन ठाकरे यांनी या निवडणुकीत भाजप उमेदवारांना पाठिंबा जाहीर केला आहे. मात्र, या उमेदवारांच्या प्रचारात प्रत्यक्ष सहभागी न होण्याचा निर्णय ही मनसेने घेतला आहे. भाजप उमेदवारांना पाठिंबा देण्याचा मनसेचा निर्णय राष्ट्रवादी काँग्रेसच्या नाकाला झोंबला आहे. मनसेने ईडीच्या भीतीने हा निर्णय घेतला असल्याची टीका राष्ट्रवादी काँग्रेसने केली आहे.


# चीनचा पाडलेला तो बलून हेरगिरीसाठीच

## तपासात पुरावे सापडल्याचा अमेरिकेचा दावा

**वॉशिंग्टन: वृत्तसंस्था**

दक्षिण कॅरोलिना प्रांतात अमेरिकेच्या हवाई दलाने जमीनदोस्त केलेला चीनचा बलून हवामानविषयक माहिती गोळा करण्यासाठी नव्हे, तर हेरगिरीसाठीच वापरला जात असल्याचा दावा अमेरिकेने केला आहे. पाडलेल्या बलूनचे अवशेष हस्तगत करून त्याचे विश्लेषण केले असता त्यासंबंधी पुरावे हाती आले असल्याचेही अमेरिकन संरक्षण विभागाने सांगितले आहे.

काही दिवसांपूर्वी कॅरोलिना प्रांताच्या आकाशात फिरणारा चीनचा बलून अमेरिकेच्या हवाई दलाने जमीनदोस्त केला. त्याच्या अवशेषांची तपासणी केली असता त्यामध्ये उच्च क्षमतेचे एचडी कॅमेरे आणि अन्य इलेक्ट्रॉनिक उपकरणे आढळून आली आहेत. या उपकरणांचा वापर प्रामुख्याने हेरगिरीसाठीच केला जातो, असे



अमेरिकन संरक्षण विभागाने म्हटले आहे.

चीनने मात्र अमेरिकेचे हेरगिरीचे आरोप फेटाळले आहेत. अमेरिकेने पाडलेला बलून हवामान विषयक माहिती जमा करण्यासाठीच आकाशात सोडण्यात आला होता. तो भरकटत अमेरिकेत गेला, असा त्यांचा दावा आहे. अशाप्रकारे एखाद्या देशाचा बलून दुसऱ्याच्या हवाई हद्दीत जाणे ही सर्वसामान्य बाब आहे. अमेरिका विनाकारण या प्रकरणाचा बागुलबुवा उभा करीत आहे, अशी टीका चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने केली आहे.

**ड्रॅगन ऑस्ट्रेलियावरही फुत्कारला**

दुसरीकडे बलून प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर ऑस्ट्रेलियन आपली सर्व शासकीय आणि सैनिकी कार्यालयांमधील चिनी कंपन्यांचे सीसीटीव्ही कॅमेरे काढून टाकण्याचा आदेश दिला आहे. यापुढील काळात सरकारी आस्थापनांमध्ये चिनी कंपन्यांचे कॅमेरे वापरले जाणार नाहीत, असा निर्णय ऑस्ट्रेलियाच्या सरकारने घेतला आहे. या निर्णयावरून चीन संतप्त झाला असून आपल्या कंपन्यांच्या व्यवसायावर विपरीत परिणाम करण्याच्या दृष्टीनेच ऑस्ट्रेलियाच्या सरकारने हा निर्णय घेतला आहे, असा चीनचा आरोप आहे. या निर्णयाचे परिणाम ऑस्ट्रेलियाला भोगावे लागतील, अशी धमकी ही चीनने दिली आहे.